वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट द्वारा संचालित

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित

राष्ट्रीय मुल्यांकन व मान्यता परिषद (NAAC) C मानांकित

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय

## वडनेर, त. हिंगणघाट, जि. वर्धा



माहिती पुस्तिका

२०१९-२०

Email : saicollege@rediffmail.com

web : www.saibabacollege.org

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय

वडनेर, त. हिंगणघाट, जि. वर्धा - ४४२३०७.

# ॥ आशिर्वाद ॥

वंदनिय श्री संत वासुदेव महाराज शहालंगडी, हिंगणघाट



श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर
महाविद्यालयाच्या प्रशस्त इमारतीच्या भूमिपूजन प्रसंगी
२ जानेवारी २००२

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर

आमचे प्रेरणास्थान



मा. सौ. हेमलता दिवाकर गमे
अध्यक्ष, वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट
अध्यक्ष, महाविद्यालयीन विकास समिती
श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर

आमचे मार्गदर्शक



मा. प्रा. दिवाकर गमे
सचिव, वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट
सदस्य, महाविद्यालयीन विकास समिती,
श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर



मा. अविनाश दिवाकर गमे
सहसचिव,वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट
सदस्य, महाविद्यालयीन विकास समिती
श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर



प्राचार्य विनोद मुडे
श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय,
वडनेर, जि. वर्धा
सदस्य सचिव, महाविद्यालयीन विकास समिती



१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनी वृक्षारोपण करतांना महाविद्यालयाचे संस्थापक सचिव प्रा. दिवाकर गमे, संचालक अविनाश गमे, प्राचार्य विनोद मुंडे व विद्यार्थी-विद्यार्थीनी



डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कार्यक्रम प्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ. गणेश बहादे उपस्थित प्राचार्य विनोद मुंडे, सर्व प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी-विद्यार्थीनी



मतदार नोंदणी अभियान अंतर्गत मार्गदर्शन करतांना नायब तहसिलदार सुभाष जाधव हिंगणघाट



जागतिक स्तनपान दिना निमित्य मार्गदर्शन करतांना प्रा. सारीका चौधरी मंचावर प्रा. आरती देशमुख, प्रा. रुपाली ठाकरे, कु. प्रिती सावंकार.



समाजशास्त्र अभ्यास मंडळाद्वारे नाथजोगी समाज, भगवा भेटी प्रसंगी अध्ययन करतांना महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थीनी



महात्मा फुले स्मृतिदिन निमित्य महात्मा फुले यांचे स्त्री उत्थानात योगदान या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. गणेश बहादे मंचावर उपस्थित प्राध्यापक वर्ग



छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्य महाराष्ट्रातील समाज सुधारणे छत्रपती शाहू महाराजांचे योगदान या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. विठ्ठल घिनमिने



राष्ट्रीय मतदार दिवस निमित्याने शपथ घेतांना महाविद्यालयीन सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थीनी

# वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर संलग्नित

राष्ट्रीय मुल्यांकन व मान्यता परिषद (NAAC) C मानांकित

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय

वडनेर, त. हिंगणघाट, जि. वर्धा - ४४२३०७

## पदवी अभ्यासक्रम- कला विभाग

बी.ए. भाग १ (सेमिस्टर-१, सेमिस्टर-२)
बी.ए. भाग २ (सेमिस्टर-३, सेमिस्टर-४)
बी.ए. भाग ३ (सेमिस्टर-५, सेमिस्टर-६)

**माहिती पुस्तिकेतील सर्व माहिती अत्यंत महत्वाची असून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात ॲडमिशन घेते वेळी ती माहिती व सुचना काळजीपूर्वक वाचावी व त्याचे काटेकोरपणे पालन करावेत.**

प्राचार्य
श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर

**किंमत : ४०/- रूपये**

कार्यालय : फोन :(07153) 255654, प्राचार्य - 255655, फॅक्स - 255656
व्यवस्थापन कार्यालय : 255657, प्राध्यापक कक्ष : 255658, ग्रंथालय कक्ष : 255652

### -: विशेष सुचना :-

सर्व विद्यालयीन विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, दररोज सकाळी ८.०५ वाजता महाविद्यालयीन पटांगणात सामूहिक राष्ट्रगीत व विद्यापीठ गीत गायन होईल. सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन गणवेशात वेळेवर उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

## आपले राष्ट्रगीत

जन-गण-मन-अधिनायक, जय हे,
भारत - भाग्य विधाता।
पंजाब सिन्धु गुजरात मराठा
द्राविड - उत्कल - बंग
विंध्य हिमाचल यमुना गंगा
उच्छल - जलधि - तरंग
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिष मागे
गाहे तव जय गाथा ।
जन - गण मंगलदायक, जय हे,
भारत भाग्य विधाता ।
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय, जय हे ।।
- रविन्द्रनाथ टागोर

## वन्दे मातरम्

वन्दे मातरम् ।
सुजलां सुफलां मलयजशीतलाम्
सस्यशामलां मातरम् ।
शुभ्रजोत्सनां पुलकितयामिनीम्
फुल्लकुसुमित द्रुमदलशोभिनीम्
सुहासिनीं सुमधुरभाषिणीम्
सुखदां वरदां मातरम्।
वन्दे मातरम्।
- बंकिमचंद्र चॅटर्जी



## - पसायदान -

आता विश्वात्मकें देवें। येणे वाग्यज्ञे तोषावे।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हें ।।१।।
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो।
भूतां परस्परे पडो । मैत्र जीवाचें ।।२।।
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।।
जो जे वांच्छील तो ते लाहो । प्राणिजात ।।३।।
वर्षत सकळ मंगळी । ईश्वर-निष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ।।४।।
चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव ।
बोलले जे अर्णव । पीयूषांचे ।।५।।
चंद्रमे जें अलांछन । मार्तंड ते तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।६।।
किंबहुना सर्वसुखी । पुर्ण होऊनि तिन्ही लोकी ।
भजिजो आदि पुरूषी । अखंडित ।।७।।
आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकी इये ।
दृष्टादृष्टा विजये । होआवे जी ।।८।।
येथे म्हणे श्री विश्वेशरावो । हा होईल दान पसावो ।
येणे वर ज्ञानदेवो । सुखिया झाला ।।९।।
- संत ज्ञानेश्वर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

## विद्यापीठ गीत

# महाविद्यालयाची प्रार्थना



*या भारतात बंधुभाव नित्य वसू दे।
दे वरचि असा दे।
हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे,
मतभेद नसू दे।।धृ।।
नांदोत सुखे गरिब-अमिर एक मतानी।
मग हिंदू असो ख्रिश्चन, वा हो इस्लामी।
स्वातंत्र्यसुखा या सकलांमाजि वसू दे।
दे वरचि असा दे।।१।।
सकळांस कळो मानवता,
राष्ट्रभावना हो सर्वस्थळी मिळूनी समुदाय प्रार्थना।
उद्योगि तरूण वीर शिलवान दिसू दे।
दे वरचि असा दे।।२।।
हा जातिभाव विसरूनिया एक हो आम्ही ।
अस्पृश्यता समूळनष्ट हो जगातुनी।
खळ निंदका मनीहि सत्य न्याय वसू दे।
दे वरचि असा दे।।३।।
सौंदर्य रमो घर - घरात स्वर्गी ज्यापरी ।
ही नष्ट होऊ दे विपत्ति भीती बोहरी ।
तुकड्यास सदा सर्वदा सेवेत कसू दे।
दे वरचि असा दे ।।४।।
या भारतात बंधुभाव नित्य वसू दे।
दे वरचि असा दे। दे वरचि असा दे।
दे वरचि असा दे।*

**वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

# वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट

## व्यवस्थापन समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सौ. हेमलता दिवाकर गमे | - | अध्यक्ष |
| २. | श्री. विनोद वामनराव राऊत | - | उपाध्यक्ष |
| ३. | प्रा. दिवाकर नानाजी गमे | - | सचिव |
| ४. | श्री. अविनाश दिवाकर गमे | - | सहसचिव |
| ५. | श्री. संतोष महादेवराव महल्ले | - | कोषाध्यक्ष |
| ६. | सौ. गितादेवी पंजाबराव ठाकरे | - | सदस्या |
| ७. | सौ. लता देवरावजी इंगोले | - | सदस्या |

वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर

## -: महाविद्यालयीन समिती :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | सौ. हेमलता दिवाकर गमे | (संस्था अध्यक्ष) | अध्यक्ष |
| २) | प्रा. दिवाकर नानाजी गमे | (संस्था सचिव) | सदस्य |
| ३) | श्री. विनोद वामनराव राऊत | (शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधी) | सदस्य |
| ४) | श्री. प्रदिप माधवराव महल्ले | (उद्योग व संशोधन क्षेत्रातील) | सदस्य |
| ५) | श्री. अविनाश दिवाकर गमे | (सामाजिक क्षेत्रातील) | सदस्य |
| ६) | प्रा. विनोद मारोतराव मुडे | (कार्यकारी प्राचार्य) | सदस्य सचिव |
| ७) | प्रा. डॉ. नरेश अंबादासजी भोयर | (विभाग प्रमुख) | सदस्य |
| ८) | प्रा. संजय आत्माराम दिवेकर | (अंतर्गत गुणवत्ता हमी समिती) | सदस्य |
| ९) | प्रा. डॉ. गणेश नथ्थुजी बहादे | (शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य |
| १०) | प्रा. डॉ. विठ्ठल माणिकराव घिनमिने | (शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य |
| ११) | प्रा. आरती मुरारी देशमुख | (महिला शिक्षक प्रतिनिधी) | सदस्य |
| १२) | श्री. नरेश मोतीरामजी कातडे | (शिक्षकेत्तर प्रतिनिधी) | सदस्य |
| १३) | श्री. राहुल अशोकराव दुरतकर | (माजी विद्यार्थी) | सदस्य |
| १४) | विद्यार्थी परिषदेचे सभापती | (प्रतिनिधी) | सदस्य |
| १५) | विद्यार्थी परिषदेचे सचिव | (प्रतिनिधी) | सदस्य |

## आमचे विद्यापीठ – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ नागपूर

महाराष्ट्र शासनाने वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था हिंगणघाट या संस्थेला दिनांक १२ एप्रील २००१ चे आदेशानुसार वडनेर येथे हे महाविद्यालय सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. त्याचप्रमाणे नागपूर विद्यापीठाने दि. १० मे २००१ चे आदेशानुसार या महाविद्यालयाला प्रथम संलग्निकरण व मान्यता प्रदान केलेली आहे. त्या अनुसार दि. १८ जून २००१ या वर्षापासून श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय वडनेर हे महाविद्यालय सुरू झालेले आहे.

आमचे हे महाविद्यालय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे अंतर्गत त्यांच्या मार्गदर्शनानुसार ग्रामीण विभागातील विद्यार्थी व विद्यार्थीनींना उच्च शिक्षण देण्याचे कार्य करीत आहे. नागपूर विद्यापीठाचे अंतर्गत आमचे महाविद्यालय आहे ही फार मोठी गौरवाची व स्वाभिमानाची बाब आहे.

नागपूर विद्यापीठाचे परंपरा ही राष्ट्राभिमानी व गौरवशाली अशा ज्ञानपीठाची तेजस्वी परंपरा आहे. ४ ऑगस्ट १९२३ रोजी नागपूर विद्यापीठाची स्थापना झाली. त्या स्वातंत्र्यपूर्व काळामध्येही या देशामध्ये सुरू असलेल्या स्वातंत्र्य लढ्यात याच नागपूर विद्यापीठाने आपली राष्ट्रीय अस्मिता कायम ठेवून स्वातंत्र्यविरांना अनमोल सहकार्य दिले आहे. 'वंदे मातरम्' च्या चळवळीत सहभागी झाल्यामुळे उस्मानिया विद्यापीठामधून काढून टाकलेल्या पाचशे विद्यार्थ्यांना इंग्रजी सत्तेची पर्वा न करता, स्वातंत्र्य पूर्व काळात नागपूर विद्यापीठात प्रवेश देण्याचा धाडसी निर्णय त्या वेळचे मा. कुलगुरू डॉ. टी. जी. केदार यांनी घेतला होता. इंग्रजी राजवटीच्या विरोधात निर्णय घेवून याच नागपूर विद्यापीठाने देशाला राष्ट्रप्रेमाची महती दिलेली आहे.

१९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात सहभागी झाल्यामुळे ज्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात व्यत्यय आला अशा विद्यार्थ्यांच्या पुन्हा परीक्षा घेऊन, त्यांचेसाठी विशेष दिक्षांत समारंभ आयोजित करून त्या स्वातंत्र्यवीर विद्यार्थ्यांना नागपूर विद्यापीठाने मोठ्या सन्मानाने पदव्या प्रदान केल्या आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात नागपूर विद्यापीठाने सन १९३८ मध्ये राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना डॉक्टर ऑफ लॉ, सन १९४३ मध्ये स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांना डॉक्टर्स ऑफ लेटर्स ही मानद पदवी देऊन या महान राष्ट्रीय नेत्यांना सन्मानीत केलेले आहे. सरोजीनी नायडू यांना सन १९३१ साली, श्री. सी. राजगोपालचारी यांना सन १९४४ साली तर भारताचे लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांना १९४६ साली विद्यापीठाने निमंत्रित केले होते. या वरून नागपूर विद्यापीठाच्या स्वातंत्र्य प्रेमाची आणि राष्ट्राच्या अस्मितेची आपणाला जाणीव होते.

अशी राष्ट्रीयत्वाची महान परंपरा जोपासलेल्या या नागपूर विद्यापीठाने सामान्य विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे म्हणून देशामध्ये पहिल्यांदा पुढाकार घेतला आहे. सन १९४९ मध्ये नागपूर विद्यापीठ कायद्यात सुधारणा करून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी आर्थिक सवलती प्रदान करण्यासाठी विद्यापीठाने पुढाकार घेतला. डॉ. रघुवीर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रादेशिक भाषांमधील पाठ्यपुस्तकांची निर्मिती विद्यापीठाने त्या काळात केली आहे.

अशा या महान ओजस्वी राष्ट्रीय व सामाजिक परंपरा लाभलेल्या नागपूर विद्यापीठाच्या स्थापनेचा सुवर्ण महोत्सव समारंभ १९७३-७४ साली संपन्न झाला. नागपूर विद्यापीठाच्या वैभवशाली परंपरेत एक अनमोल भर टाकली.

अशा या महान नागपूर विद्यापीठाला लाभलेल्या कुलगुरूंची परंपरा सुद्धा अशीच महान आहे. न्यायमुर्ती,

साहित्यिक, समाजवादी आणि ज्ञान महर्षि यांची ही महान परंपरा आहे. त्या महान कुलगुरूंच्या कर्तृत्वाचा आलेख सामान्य लेखनीतून साकार सुद्धा करता येणार नाही. असे या सर्वांचे महान कर्तृत्व आहे. त्यातही काही महनियांच्या ओझरता उल्लेख करण्याचा मोह होत आहे. या परंपरेमधील सर एम. बी. नियोगी, लेफ्टनंट कर्नल डॉ. टी. जे. केदार, न्यायमुर्ती श्री. डब्ल्यु. आर. पुराणिक, न्यायमुर्ती श्री. के. मंकलमुर्ती, कर्नल न्यायमुर्ती जी. बी. बडकस, कर्नल न्यायमुर्ती एस. पी. कोतवाल, न्यायमुर्ती श्री. पी. पी. देव, महाराष्ट्रांचे थोर साहित्यिक डॉ. वि. भि. कोलते, विदर्भ कर्मभूमीचे लोकसेवक प्रा. वा. मो. काळमेघ, प्राचार्य श्री. जी. बी. कदम, महान समाजवादी अर्थतज्ञ डॉ. म. गो. बाकरे अशा ज्ञानमहर्षी समोर आम्ही नतमस्तक आहोत. अशा कुलगुरूंची परंपरा लाभलेल्या या विद्यापीठाचे आपण वारस आहोत. ही आपणाला गौरवाची स्वाभिमानाची बाब आहे.

कुलगुरूंप्रमाणेच विद्यापीठाचे प्रशासन लोकाभिमुख चालविण्यासाठी या विद्यापीठाला कुलसचिवांची सुद्धा उत्तम प्रशासक म्हणून परंपरा लाभली आहे. त्यांनी सुद्धा आपल्या प्रशासनाचा ठसा विद्यापीठावर उमटवलेला आहे. श्री. काशीदत्त पांडे, डॉ. एम. ए. मोघे, श्री. यु. मिश्रा, डॉ. एम. एस. मोडक, डॉ. व्ही. एस. भागवत अशी अनेक नांवे उल्लेखनिय आहे. परंतु या परंपरेमध्ये त्यातच श्री. बलराज अहेर यांनी सलग १५ वर्ष नागपूर विद्यापीठाचे कुलसचिव म्हणून जे लोकाभिमुख अप्रतिम कार्य केले. नागपूर विद्यापीठाच्या शिस्तीची आणि प्रशासनाची जी प्रभावी जडण-घडण केली आहे. त्याबद्दल श्री. बलराज अहेर यांचे नाव विद्यापीठाच्या उत्तम प्रशासनात कायमचे नोंदले गेले आहे. आज नागपूर विद्यापीठाचा जो प्रचंड विस्तार, विविध विद्याशाखा आणि भारतामधील विद्यापीठामध्ये नागपूर विद्यापीठ महत्वाचे प्रभावपूर्ण स्थान या मध्ये श्री. बलराज अहेर यांच्या अथक परिश्रमाचा आणि कर्तृत्वाचा फार मोठा भाग आहे. अशा या उत्तम प्रशासकांचा आम्हाला स्वाभिमान आहे. अशा या नागपूर विद्यापीठाचे या विभागातील लोकांच्या आग्रहास्तव महाराष्ट्र शासनाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ असे नामकरण केले आहे. या महान कर्मयोगी राष्ट्रसंताच्या नावाने या नागपूर विद्यापीठाला गौरव प्राप्त झालेला आहे. तो टिकविण्याची जबाबदारी या विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची आहे.

अशा या वैभवशाली राष्ट्राभिमानी, लोकाभिमुख असलेल्या आपल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलपती, महामहीम श्री. विद्यासागर राव, राज्यपाल महाराष्ट्र राज्य हे आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. सिद्धार्थविनायक काणे हे असून ते नागपूर विद्यापीठाच्या महान कुलगुरूंची परंपरा त्याच जोमाने पुढे चालवित असून नागपूर विद्यापीठाला ज्ञान क्षेत्रात सतत अद्यावत ठेवून विकासाच्या मार्गावर नेत आहे.

अशी महान ओजस्वी राष्ट्राभिमानी व लोकाभिमुख परंपरा लाभलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे अंतर्गत आपण सारे ग्रामीण भागातील विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहोत. हे करीत असतांना आपण या विद्यापीठाला लाभलेल्या महान कुलगुरूंच्या परंपरेचा स्वत:ला विसर होवू देवू नये. अशा महान तेजोमयी तपस्वी ज्ञानमहर्षीची परंपरा लाभलेल्या विद्यापीठाचे व त्या अंतर्गत चालणाऱ्या या महाविद्यालयाचे आपण विद्यार्थी आहोत. त्यांचे भविष्य कालीन वारसदार आहोत. याचा सार्थ अभिमान आणि जाण ठेवून, त्या परंपरेला शोभेल अशा प्रकारचे शिक्षण या महाविद्यालयातून आपण घ्यावे हीच अपेक्षा आहे.

प्रा. दिवाकर गमे
सचिव

## : प्रस्तावना :

वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था हिंगणघाट या संस्थेची स्थापना शिक्षण प्रसारासाठी झाली असून या परिसरातील ग्रामीण विभागातील उच्च शिक्षण सुरू करणे या संस्थेचा उद्देश होता. या संस्थेमध्ये प्रामुख्याने शिक्षक व शिक्षणांशी संबंधित व्यक्तिचाच समावेश आहे. त्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना व विशेषत: विद्यार्थीनींना या स्पर्धात्मक संगणकीय युगात चांगल्या प्रकारचे दर्जेदार उच्च शिक्षण मिळावे हा सर्वांचा प्रयत्न होता.

वडनेर व त्याच्या परिसरात महाविद्यालयाची अत्यंत आवश्यकता होती. त्यामुळे नागपूर विद्यापीठाने सन १९९२ मध्ये नविन महाविद्यालय सुरू करावयाच्या मास्टर प्लॅन मध्ये वडनेर या ठिकाणाचा समावेश केलेला होता. परंतु वडनेर व त्याच्या परिसरात महाविद्यालयाची परवानगी नसल्यामुळे या परिसरात विद्यार्थ्यांची अत्यंत गैरसोय होत होती. विशेषत: या परिसरातील विद्यार्थीनी दूर शहरात जावून शिक्षण घेवू शकल्या नव्हत्या. त्यामुळे त्या विद्यार्थीनी महाविद्यालयीन शिक्षणापासून वंचित राहत होत्या. यामुळे या विद्यार्थीनीसाठी पुढील प्रगतीची दारे बंद झालेली होती.

त्यामुळे वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्थेने या परिसरात वडनेर येथे महाविद्यालय सुरू करण्याची परवानगी मागितली होती. त्या अनुसार महाराष्ट्र शासनाने वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट या संस्थेला वडनेर येथे २००१-२००२ या शैक्षणिक सत्रापासून कला महाविद्यालय सुरु करण्यास दिनांक १२ एप्रील २००१ चे आदेशानुसार परवानगी दिलेली आहे. त्या अनुसार हे महाविद्यालय दि. १८ जून २००१ पासून सुरू झाले आहे.

या परिसरात वडनेर येथे महाराष्ट्र शासनाने वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्थेला वडनेर येथे श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय सुरू करण्याची परवानगी दिली आहे व महाविद्यालय सुरू केलेले असून त्यामुळे या भागातील होतकरू व गरीब विद्यार्थी व विशेषत: विद्यार्थीनीची फार मोठी महाविद्यालयीन शिक्षणाची सोय स्थानिक ठिकाणी व आपल्या परिसरात झालेली आहे. या महाविद्यालयाच्या परवानगीबद्दल महाराष्ट्र शासन व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांना या परिसरातील जनतेच्या वतीने अनंत हार्दिक धन्यवाद !

महाविद्यालयाच्या प्रशस्त इमारतीमध्ये महाविद्यालयाचे वर्ग सुरू असून प्रशस्त इमारतीसोबत सुसज्ज वर्ग खोल्या, समृद्ध ग्रंथालय, वाचनकक्ष, सांस्कृतिक हॉल, विस्तृत आऊट डोअर क्रिंडागण, कॅन्टीन, प्रयोगशाळा, कॉम्प्युटर लॅब, स्वच्छ व हिरवा परिसर, बगीचा, पळसबाग, विद्यापीठ परिक्षा केंद्र इत्यादी सोयीनी उपयुक्त असा महाविद्यालय परिसर आहे. महाविद्यालयात बी.ए. सेमिस्टर-१,२,३,४, ५, ६ या वर्गात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत आहे.

या परिसरातील ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक उच्च शिक्षण देण्यासाठी तज्ञ व अनुभवी प्राध्यापक वृंद, ग्रंथालय पुस्तके, संदर्भ ग्रंथ, स्पर्धा परिक्षा व अवांतर पुस्तके, विविध क्रिडा साहीत्य, विषयनिहाय अभ्यासमंडळाद्वारे विविध उपक्रमांचे आयोजन. सांस्कृतिक विभाग, व्यक्तिमत्व विकास समिती, विद्यार्थी कल्याण समिती, स्वयं रोजगार मार्गदर्शन व प्रशिक्षण (ॲग्रो सर्व्हिस, ब्युटी पार्लर, फोटोग्रॉफी), राष्ट्रीय सेवा योजना, वार्षिक स्नेहसंमेलन, शैक्षणिक अभ्यास सहल, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन व आयोजन, महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यापीठ परिषद, विद्यापीठ स्तरावर क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सहभाग. माजी विद्यार्थी व पालक मेळावा इत्यादींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा चतुरस्त्र विकास साधून एक सुजान नागरिक घडविण्यास आम्ही कटीबद्ध आहोत.

आपण ग्रामीण विभागातील विद्यार्थी व विद्यार्थ्यांचे सुजाण पालक आहात. आपणांस आवाहन करण्यात येते की, श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालयात उपलब्ध असणाऱ्या सर्वंकष शैक्षणिक साधन सामुग्रीचा लाभ आपण आपल्या पाल्याच्या उच्च शिक्षणासाठी अवश्य घ्यावा. या महाविद्यालयाच्या निमित्ताने उच्च शिक्षणाची दारे आपणास खुली करण्यात आली आहे. आपण सारे मिळून त्यात सहभागी होवू आणि नव्या संगणकीय क्रांतीच्या सहस्त्रकात आपल्या प्रगतीला सोबत घेवून पुढे जाऊ अशी आपणांस विनंती करून आपणा सर्वांना हे विनम्रपणे आवाहन करीत आहे.

प्राचार्य विनोद मुडे

वडनेर — श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर

## महाविद्यालयाची आकर्षणे

१. **राष्ट्रीय सेवा योजना** -(N.S.S.):- या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास आणि नेतृत्व गुणांचा विकास व्हावा तसेच गरिब व श्रीमंती, शहरी व ग्रामीण ही दरी कमी व्हावी विद्यार्थ्यांमध्ये देश प्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधीलकी, श्रमाचे महत्व यासाठी स्वयंसेवक तत्पर व सक्षम व्हावा यासाठी नियमित कार्यक्रम व विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबीर आयोजीत केली जातात. या उपक्रमामध्ये सहभागी विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून अतिरिक्त १० गुण देण्यात येतात. तसेच विद्यार्थी विद्यापीठ, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील शिबीरामध्ये सहभागी होवू शकतात.

२. **आजीवन अध्ययन व विस्तार विभाग** :- अंतर्गत लोकसंख्या शिक्षण उपक्रमात बी.ए. सेमिस्टर १ च्या विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतल्या जातात व त्या करीता विद्यापीठाकडून सहभागी विद्यार्थ्यांना अतिरिक्त १० गुण देण्यात येतात.

३. **महाविद्यालयीन वार्षिकांक** - दरवर्षी महाविद्यालयाचा वार्षिकांक प्रकाशित होते. त्यात मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतील लेख, कविता, कथा व निबंध प्रकाशित होतात. वर्षभराचे वेगवेगळ्या विषयाच्या अभ्यास मंडळाच्या कार्याचे इतिवृत्तही यात असते. यासाठी विद्यार्थ्यांनी आपले साहित्य दिनांक ३१ डिसेंबर पर्यंत संबंधित प्राध्यापकांकडे द्यावेत.

४. **युवा स्फुर्ति महोत्सव** :- दरवर्षी जानेवारी महिन्यात विद्यार्थी व विद्यार्थीनीच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना चालना मिळावी तसेच विद्यार्थ्यांचा बौद्धीक विकासाला चालना मिळावी म्हणून युवा स्फुर्ति महोत्सव साजरा करण्यात येतो. यात प्रामुख्याने रांगोळी स्पर्धा, बचाव स्पर्धा, वाद-विवाद स्पर्धा, पुष्परचना स्पर्धा, स्पर्धा परिक्षा, निबंध स्पर्धा, पथनाट्य, प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम, गित गायन स्पर्धा, स्वलिखित काव्य वाचन स्पर्धा, वेशभुषा स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धा, पुष्परचना व डिश डेकोरेशन स्पर्धा व क्रिडा स्पर्धा, खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, गोळाफेक, थाली फेक, भाला फेक, रनींग १०० मी, लांब उडी इत्यादींचे आयोजन केले जाते.

५. **Internet-WiFi ची सोय** :- महाविद्यालयातील ग्रंथालयात विद्यार्थ्यांकरीता महाविद्यालयीन वेळेत मोफत Internet-WiFi ची सोय करण्यात आली आहे.

६. **खेळ** :- विद्यार्थ्यांच्या शारिरीक विकासासाठी देशी व विदेशी खेळांची व्यवस्था केली आहे. कवायत, खेळ व शारिरीक शिक्षण प्रशिक्षकांचे नियंत्रणाखाली होईल.

विद्यापीठाने खेळाकरीता १० अतिरिक्त गुण (Credit Marks) दिलेले आहेत.

१) आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा – प्रत्येकी १० गुण

२) आंतर विद्यापीठ स्पर्धा – प्रत्येकी १५ गुण

३) संयुक्त विद्यापीठ स्पर्धा – प्रत्येकी २५ गुण

७. **महाविद्यालय ग्राहक भंडार :-** महाविद्यालयात श्री साईबाबा महाविद्यालय ग्राहक सहकारी भंडार असून त्याचा फायदा विद्यार्थ्यांना घेता येईल. त्याकरिता प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्क रू. ५/– व सभासद शुल्क रू. १०/– अनिवार्यपणे प्रवेश घेतांना भरावे लागेल व सर्व विद्यार्थी ग्राहक भंडाराचे नाममात्र सभासद राहतील.

८. **रक्तदान व रक्तगट तपासणी शिबिर :-** महाविद्यालयामध्ये दरवर्षी जानेवारी महिण्यात महाविद्यालयीन प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी रक्तदान करतात.

९. **विषय निहाय अभ्यास मंडळ :-** महाविद्यालयामध्ये दरवर्षी मराठी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात येते. ह्या माध्यमातून चर्चासत्र, परिसंवाद, वादविवाद, भाषन, व्याख्यान, बीजभाषण इत्यादीचे आयोजन करण्यात येते. ह्याकरीता विषयतज्ञ, विचारवंत, थोर अभ्यासक यांना बोलावण्यात येते. ह्यामध्ये विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग असतो.

१०. **ग्रंथालय :** – विविध विषयावरील उपयुक्त अशा ग्रंथांना सुसज्ज असे महाविद्यालयाचे ग्रंथालय आहे. विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणारा ग्रंथसंग्रह ग्रंथालयात असून प्रतिवर्षी त्यात वाढ होत आहे. विद्यार्थ्यांना कर्जाऊ पद्धतीने पुस्तके पुरविण्याची सोय महाविद्यालयात आहे. विद्यापीठ परीक्षा काळात पुस्तकांची किंमत भरून विद्यार्थ्यांना परीक्षा होईपर्यंत पुस्तके मिळू शकतात. महाविद्यालयात दरवर्षी विद्यापीठ परिक्षा काळात विशेष अभ्यास कक्ष सुरू करण्यात येईल. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या दृष्टीने तयारी करण्यासाठी ग्रंथालयातील विशेष अभ्यास कक्षात बसून अभ्यास करता येईल. तसेच तेथेच प्राध्यापकांचे मार्गदशन आणि विविध पुस्तके उपलब्ध करून देण्यात येईल.

महाविद्यालयातील ग्रंथालयात इंग्रजी, मराठी व हिंदी वर्तमानपत्रे, देशी–विदेशी पाक्षिके व मासिके, जर्नल नियमितपणे येत असतात विद्याव्यासंग व सामान्य ज्ञान यांच्या वृद्धीसाठी विद्यार्थ्यांनी नियमितपणे नियतकालांचे वाचन करणे अगत्याचे आहे.

ग्रंथालयाविषयी काही अडचणी, सूचना किंवा तक्रारी असल्यास त्या प्रथम ग्रंथपालाकडे नोंदवाव्या.

११. **प्राध्यापक वर्ग :-** सुविद्य आणि अनुभवी प्राध्यापकांचा संच महाविद्यालयात आहे. त्यामुळे महाविद्यालयातील परीक्षांचे निकाल व इतर शैक्षणिक प्रगती समाधानकारक राहतील. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्राचार्य व प्राध्यापक तत्पर असतात.

१२. **पर्यावरण सेवा योजना :-** महाविद्यालयामध्ये पर्यावरण सेवा योजनेची स्थापना दरवर्षी करण्यात येते. या माध्यमातून पर्यावरणाचा समतोलपणा राखण्याच्या दृष्टीने विविध उपक्रमाचे व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल.

१३. **विशेष कार्यक्रम :-** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्याने सप्ताह साजरा करण्यात येणार असून जिल्हास्तरीय, विद्यापीठस्तरीय व विदर्भ स्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून यामध्ये विदर्भातील विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल. विजेता स्पर्धकांना रोख बक्षिस, स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

१४. **महापुरूषांच्या जयंती, पुण्यतिथी व दिन विशेष कार्यक्रम** :- महापुरूषाच्यांच्या जयंती, पुण्यतिथी व दिन विशेष कार्यक्रम संबंधीत तारखेला महाविद्यालयाच्या सांस्कृतिक हॉल मध्ये निश्चित केलेल्या वेळात सकाळी घेण्यात येईल. तरी याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## -: महाविद्यालयातील कार्यरत विविध समिती :-

१. **महाविद्यालयीन विकास समिती (CDC)** :- सदस्य सचिव - प्राचार्य
२. **राष्ट्रीय मुल्यांकन एवं प्रत्यायन परिषद (NAAC)** :- समन्वयक - प्रा. संजय दिवेकर
३. **अंतर्गत मुल्यमापन हमी समिती (IQAC)** :- समन्वयक - प्रा. संजय दिवेकर
४. **पर्सनल कौंसीलींग समिती** : अध्यक्ष - प्राचार्य
५. **सांस्कृतिक समिती** :- समन्वयक - प्रा. डॉ. प्रवीण कारंजकर
६. **राष्ट्रीय सेवा योजना (NSS)** :- समन्वयक - प्रा. डॉ. गणेश बहादे
७. **आजीवन अध्ययन व विस्तार विभाग** :- समन्वयक - प्रा. नितेश तेलहांडे
८. **खेळ व क्रिडा समिती** :- समन्वयक - प्रा. डॉ. नरेश भोयर
९. **स्वयं रोजगार समिती (कृषी सेवा, फोटोग्राफी सौंदर्यशास्त्र)** :- समन्वयक - प्रा.डॉ. विठ्ठल घिनमिने
१०. **कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगीक शोषण निवारण समिती** : समन्वयक - प्रा. आरती देशमुख
११. **संगणक प्रशिक्षण समिती** : समन्वयक - प्रा. डॉ. नरेश भोयर
१२. **महाविद्यालयीन परिक्षा समिती** : समन्वयक - प्रा. नितेश तेलहांडे
१३. **विद्यार्थी कल्याण सहाय्यता समिती** : समन्वयक - प्रा. डॉ. प्रवीण कारंजकर
१४. **माजी विद्यार्थी व पालक समिती** :- समन्वयक - प्रा. डॉ. गणेश बहादे
१५. **ग्रंथालय समिती** : समन्वयक - प्रा. सारिका चौधरी
१६. **पर्यावरण समिती (इको क्लब)** : समन्वयक - प्रा. पंकज मून
१७. **स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन समिती** : समन्वयक - प्रा. संजय दिवेकर
१८. **ॲन्टी रॅगींग समिती** :- समन्वयक - प्रा. डॉ. प्रवीण कारंजकर
१९. **शिस्त व पालन समिती** :- समन्वयक - प्रा. नितेश तेलहांडे
२०. **विद्यार्थी तक्रार निवारण समिती** :- समन्वयक - प्रा. डॉ. विठ्ठल घिनमिने
२१. **विद्यार्थीनी तक्रार निवारण समिती** :- समन्वयक - प्रा. आरती देशमुख
२२. **योगा आणि मेडीटेशन समिती** :- समन्वयक - प्रा. डॉ. नरेश भोयर
२३. **सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट समिती** :- समन्वयक - प्रा. आरती देशमुख
२४. **जातीय भेदभाव निवारण समिती** :- समन्वयक - प्रा. डॉ. प्रवीण कारंजकर
२५. **विद्यार्थी परिषद्** :- समन्वयक - प्रा. पंकज मून
२६. **महाविद्यालयीन वेळापत्रक व नियोजन समिती** : समन्वयक - प्रा. डॉ. विठ्ठल घिनमिने
२७. **महाविद्यालयीन प्रवेश समिती** :- अध्यक्ष, प्राचार्य विनोद मुडे, सदस्य - डॉ. प्रवीण कारंजकर, डॉ. गणेश बहादे, डॉ. विठ्ठल घिनमिने, डॉ. नरेश भोयर, प्रा. आरती देशमुख, प्रा. पंकज मून, प्रा. नितेश तेलहांडे, प्रा. संजय दिवेकर, प्रा. सारीका चौधरी, प्रा. रूणाली ठाकरे.

## महाविद्यालयीन अभ्यासक्रम

### बी. ए. भाग १, २, ३ करिता

* इंग्रजी आणि मराठी दोन्ही आवश्यक विषय
* समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, गृहअर्थशास्त्र, मराठी वाङःमय, इंग्रजी वाङःमय या ऐच्छिक विषयांमधून तीन विषय (प्रवेश समितीच्या निर्णयानुसार)

**- प्रवेश पद्धतीबाबतचे नियम -**

१. प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे व माहिती :-
   १. शाळा किंवा महाविद्यालय सोडल्याचे ओरिजनल प्रमाणपत्रासह (टी.सी.) सहा झेरॉक्स प्रती
   २. मागील वर्षीच्या (वर्ग १२ वी किंवा बी.ए. सेमिस्टर) ओरिजनल गुणपत्रिकेसह (Marksheet) सहा झेरॉक्स प्रती
   ३. वर्ग १० च्या गुणपत्रिका व टी.सी. च्या एक-एक झेरॉक्स प्रत
   ४. पाच (५) पासपोर्ट साईज फोटो
   ५. ई-मेल आयडी व मोबाईल नंबर
   ६. आधार कार्डच्या एक झेरॉक्स
   ७. प्रवेशा वेळी जातीचे प्रमाणपत्राची एक झेरॉक्स प्रत
   ८. डोमेसाईल प्रमाणपत्र (अधिवास प्रमाणपत्र)

२. प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यांनी किंवा विद्यार्थ्यांच्या पालकांनी ऐच्छिक विषयामधून घेतलेल्या तिन विषयामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करता येणार नाही किंवा विषय बदलवून मिळणार नाही.

३. विद्यार्थ्यांने तत्पूर्वीची परीक्षा खाजगीरित्या दिली असल्यास बोर्ड अथवा विद्यापीठाचे अस्थायी प्रमाणपत्र (प्रोव्हीजन सर्टिफिकेट इन ओरिजनल) आणि तत्पूर्वीच्या परीक्षेची मूळ गुणपत्रिका व त्याची प्रतिलिपी सहा. प्रति.

४. बी. ए. सेमिस्टर च्या पुन्हा प्रवेशासाठी (Re-admission) नामांकन ट्रान्सफर प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

५. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण अथवा नागपूर विद्यापीठ या व्यतिरिक्त इतर बोर्ड किंवा विद्यापीठातून येणाऱ्या विद्यार्थ्यांने मूळ क्षेत्रांतरण प्रमाणपत्र (Migration Certificate) व त्याची सत्यप्रतिलिपी दोन प्रती प्रवेशाच्या वेळी देणे आवश्यक आहे.

६. ज्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ अथवा नागपूर विद्यापीठ या व्यतिरिक्त बोर्डाची किंवा विद्यापीठाची पात्रता परीक्षा उत्तीर्ण केली असेल अशा विद्यार्थ्यांना नागपूर विद्यापीठातून प्रवेश पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) प्राप्त करून दाखल करावे लागेल.

   हे प्रमाणपत्र नागपूर विद्यापीठाच्या कार्यालयात दि. १५ सप्टेंबर पर्यंत पोहोचणे आवश्यक असल्यामुळे ते महाविद्यालयाच्या कार्यालयात दि. १ सप्टेंबर पर्यंत दाखल करण्यात यावे. मुदतीच्या आत प्रमाणपत्र दाखल न केल्यास विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे प्रति महा विलंब शुल्क आकारण्यात येईल. हे प्रमाणपत्र कार्यालयात (त्याबाबतचे दंडासहित) दाखल होईपर्यंत विद्यार्थ्यांचा महाविद्यालयातील प्रवेश अस्थायी (प्रोव्हीजनल) राहील.

७. प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यास माहिती पुस्तिकेत नमूद केलेले सर्व शुल्क व निधी ताबडतोब भरावे लागेल. विद्यार्थ्याने स्वत: हून प्रवेश नाकारल्यास त्याने भरलेली रक्कम कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.

८. कोणत्याही वर्गात दाखल होताना विद्यार्थ्याने त्याबाबतची नियमानुसार स्वत:ची पात्रता पारखून घ्यावी कोणत्याही वर्गातील चुकीच्या प्रवेशासंबंधी संपूर्ण जबाबदारी सर्वस्वी विद्यार्थ्यावर राहील. नियमानुसार विद्यार्थी अपात्र ठरल्यास त्याने भरलेले प्रवेश शुल्क परत केले जाणार नाही.

९. प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यास प्राचार्य किंवा प्रवेश समितीपुढे मुलाखतीसाठी बोलविल्यास स्वखर्चाने यावे लागेल. अन्यथा प्रवेश न मिळाल्यास सर्व जबाबदारी विद्यार्थ्यांचीच राहील.

१०. महाविद्यालयाकडून प्रवेश नाकारण्यात आल्यास आवेदनपत्रासोबत जोडलेली प्रमाणपत्रे प्रवेश नाकारल्यानंतर पंधरा दिवसात परत करण्यात येतील. प्रवेश मिळाल्यास एकदा भरलेली रक्कम पुन्हा परत मिळणार नाही.

११. कार्यालयाकडून विद्यार्थ्याला प्रमाणपत्रे, सवलतीचे अर्ज, शिक्षण शुल्क, विद्यापीठ परीक्षांचे अर्ज, निधी, दंड इत्यादी ज्या पावत्या व नोंदी मिळतील त्या त्याने काळजीपूर्वक ठेवाव्यात. तसे न केल्यास रेकॉर्ड शोधण्यासाठी विद्यार्थ्याला कार्यालयात रू. ५०/ – शोध शुल्क भरावे लागतील.

१२. शैक्षणिक सत्रामध्ये महाविद्यालय सोडल्यास पूर्ण सत्राचे शुल्क भरावे लागेल. फक्त सरकारी नोकरीत असलेल्या पालकांच्या पाल्यांना बदली झाल्यास त्याबाबत सुट देण्यात येईल.

१३. विद्यार्थ्यांना आर्थिक सवलती, शिष्यवृत्ती यासाठी विहित नमुन्यामध्ये प्रवेश घेतल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत अर्ज सादर करावे लागतात. त्याबाबतची माहिती प्रवेश घेतेवेळीच विद्यार्थ्यांने कार्यालयातून जाणून घेणे आवश्यक आहे. योग्यवेळी रीतसर व आवश्यक त्या कागदपत्रांसोबत अर्ज न दिल्यास शिष्यवृत्ती अथवा सवलत नामंजूर होण्याची शक्यता असते. शिष्यवृत्ती / सवलत नामंजूर झाल्यास पूर्ण शुल्क भरावे लागेल.

**शिष्यवृत्ती फार्मसाठी लागणारी प्रमाणपत्रे –** (महाविद्यालयात प्रवेश घेतांना संबंधित कागदपत्रे तयार ठेवावी)

१. ॲडमिशन पावतीची झेरॉक्स
२. पासपोर्ट साईज फोटो–२
३. दहावीच्या मार्कशिटची एक झेरॉक्स
४. बारावीच्या मार्कशिटची एक झेरॉक्स
५. बारावीच्या लिव्हींग ची एक झेरॉक्स
६. बँक पास बुकची झेरॉक्स– एक (राष्ट्रीयकृत बँक)
७. उत्पन्नाचा दाखला ओरिजनल (तहसिलदाराचा)
८. डोमेसिअल (रहिवासी) दाखला–एक झेरॉक्स
९. नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट (जातीचा दाखला–एक झेरॉक्स)
१०. रेशन कार्डाची झेरॉक्स–एक
११. आधार कार्डाची झेरॉक्स – एक
१२. बँक खाते आधार लिंक फॉर्म झेरॉक्स–एक
१३. गॅप असल्यास ॲफिडेव्हीट झेरॉक्स–एक
१४. वडिल नसल्यास वडिलांचा मृत्युचा दाखला– एक झेरॉक्स
१५. बंध पत्र व हमी पत्र

वरील सर्व सर्टिफिकेटची झेरॉक्स प्रत स्पष्ट असावी हि सर्व कागदपत्रे महाविद्यालयातील श्री. संजय पर्वत (शिष्यवृत्ती विभाग) यांचेकडून तपासून घ्यावीत व त्यानंतर विद्यार्थ्यांनी स्वत: ऑनलाईन शिष्यवृत्ती फार्म भरून त्याची हॉर्ड कॉपी श्री. संजय पर्वत लिपीक ह्यांचेकडे जमा करावी.

१४. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती फार्म नियत कालावधीच्या आत फॉर्म भरणे आवश्यक आहे. प्रवेश घेतलेल्या तारखेपासून
१५. दिवसाच्या आत शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन भरून महाविद्यालयास सादर करावा. शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन न भरल्यास त्या विद्यार्थ्याला नियमाप्रमाणे संपूर्ण शुल्क भरणे बंधनकारक राहील. व हे शुल्क दिल्याशिवाय त्याला विद्यापीठ परिक्षा परिक्षा फार्म भरता येणार नाही तसेच त्याचे ओरिजनल कुठलेही कागदपत्रे मिळणार नाही.
१६. फर्निचरच्या मोडतोडीबाबत सर्वसामान्य दंड रू. २५/ – प्रत्येक विद्यार्थ्यावर आकारण्यात येईल.

## - उपस्थिती (Attendance) -

१. महाविद्यालयात होणाऱ्या प्रत्येक तासाला उपस्थित राहणे विद्यार्थ्यांचे कर्तव्य आहे. किमान ७५% उपस्थिती अनिवार्य आहे. अन्यथा विद्यार्थ्याला विद्यापीठ परिक्षेस बसता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

२. अनुज्ञेशिवाय अनुपस्थित राहिल्यास प्रत्येक तासाला २ रू. प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

३. अनुज्ञेशिवाय किंवा पूर्व सुचनेशिवाय विद्यार्थी सतत एक महिना अनुपस्थित राहिल्यास त्याचे नाव महाविद्यालयाचे उपस्थिती पटावरुन कमी करण्यात येईल. अशा विद्यार्थ्यांना आवश्यक शुल्क भरूनच पुन:प्रवेशासाठी आवेदन करता येईल.

४. ७५% पेक्षा कमी उपस्थिती असल्यास महाविद्यालकयाकडून विद्यार्थ्यांच्या पालकांना कळविण्यात येईल तसेच त्यांना विद्यापीठ परीक्षेला बसता येणार नाही.

## - महाविद्यालयीन परीक्षा (College Examination) -

महाविद्यालयात प्रत्येक सेमिस्टर मध्ये घटक चाचणी परिक्षा व सराव परिक्षा घेण्यात येईल. ही परिक्षा देणे अनिवार्य आहे. परीक्षेला न बसल्यास प्रति पेपर रू. २०/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल. सराव परिक्षेत प्रत्येक विषयात किमान २५% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. दंड भरल्यानंतरच विद्यापीठ परीक्षेचे प्रवेश पत्र मिळेल.

## - विद्यार्थी मंडळ (Student Council) -

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ च्या कलम ४० (२) (बी) नुसार महाविद्यालयातील विद्यार्थी मंडळाची स्थापना नागपूर विद्यापीठाने केलेल्या मार्गदर्शन नियम क्र. ४ क्र. ५ (१९९६) प्रमाणे केली जाईल. या मंडळाचा कालावधी त्या सत्राच्या ३० एप्रिल पर्यंत राहील. या संबधीची सविस्तर माहिती योग्य वेळी महाविद्यालयातील सूचना फलकावर लावली जाईल.

## - पर्यावरण शास्त्र बी. ए. भाग - २ (सेमिस्टर ३ व ४)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर यांचे परिपत्रक क्र. २ दि. २७ फेब्रु. २००७ नुसार शैक्षणिक सत्र २००७-०८ पासून महाविद्यालयाच्या स्थानक स्तरापर्यंत ६ महिने कालावधीचा ''पर्यावरण अभ्यासक्रम'' बी.ए. द्वितीय वर्षाला अनिवार्य केला आहे. या विषयाची स्वतंत्र परिक्षा महाविद्यालयातर्फे घेतली जाणार असून ही उत्तीर्ण झाल्याशिवाय बी.ए. च्या परिक्षेची गुणपत्रिका प्राप्त होणार नाही याची बी.ए. भाग २ च्या विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

### इंटरनल असेसमेंट - बी.ए. सेमिस्टर १,२,३,४,५,६

प्रवेश घेतलेल्या बी.ए. सेमिस्टरच्या विद्यार्थ्यांनी घेतलेल्या सर्व विषयाची Home Assessment व Viva देणे आवश्यक आहे. त्यासाठी संबंधित विषयाच्या प्राध्यापकांचे मार्गदर्शन घ्यावे. व असेसमेंट पुर्ण करून द्यावे. न दिल्यास इंटरनल असेसमेंटचे मार्क विद्यापीठाकडे पाठविल्या जाणार नाही. ही सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील.

# आचार संहिता

१. महाविद्यालयाच्या आवारात व आवाराबाहेर महाविद्यालयाच्या शिस्तीला व व्यवस्थेला बाधक होईल असे वर्तन विद्यार्थ्यांच्या हातून घडता कामा नये.

२. प्राचार्य, प्राध्यापक व महाविद्यालयात येणारा पाहुणा व नागरिक याचा आदर राखणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे. यापासून दूर गेलेल्या विद्यार्थ्याला कडक शासन होईल.

३. प्राध्यापक वर्गात जाण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी गेले पाहिजे. प्राध्यापक वर्गातून निघून जाण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी वर्ग सोडता कामा नये.

४. तास नसतांना विद्यार्थ्यांनी व्हरांड्यात किंवा पटांगणात फिरू नये. खेळामध्ये, वाचनकक्षात व ग्रंथालयात वेळ कामी लावावा. किंवा मुलींनी त्यांच्याकरीता असलेल्या कॉमन रूममध्ये बसावे.

५. प्राध्यापकांच्या परवानगीशिवाय विद्यार्थ्यांनी आपल्या विषया व्यतिरिक्त इतर विषयांच्या वर्गात बसता कामा नये.

६. निरनिराळ्या शैक्षणिक सवलती घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी दिलेली माहिती व आवेदन पत्रातील मजकूर सर्वस्वी त्यांनाच बंधनकारक राहील. सवलत रद्द झाल्यास नियमाप्रमाणे शुल्क देण्याचे बंधन विद्यार्थ्यांवर राहील.

७. सभ्यता व शिष्टाचार यांचे कडक पालन करून संस्थेचा लौकिक वाढविण्याचे कार्य विद्यार्थ्यांनी करावे.

८. महाविद्यालयात शुल्क व इतर दंड ताबडतोब दिला पाहिजे. अडचण असल्यास प्राचार्यांकडे लेखी आवेदनपत्र सादर करावे.

९. महाविद्यालयात विवादात्मक प्रश्न उदभवल्यास त्याबाबत प्राचार्यांचा निर्णय सर्वांना बंधनकारक राहील.

१०. वह्या, पाठ्यपुस्तके व वर्गात आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांजवळ असलेच पाहिजे. वर्गातील अभ्यास, गृहपाठ, परीक्षा इत्यादी बाबतीत विद्यार्थ्यांचे वर्तन समाधानकारक असावे. विद्यापीठ परीक्षेकरीता विद्यार्थ्यांची पात्रता ठरविताना ही बाब अवश्य विचारात घेण्यात येईल.

११. महाविद्यालयाची मालमत्ता विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक वापरावी अशी अपेक्षा आहे. महाविद्यालयाच्या मालमत्तेची हेतुपुरस्पर केलेली हानी किंवा दुरूपयोग याबद्दल शिक्षा होईल.

१२. वर्गातच नव्हे तर महाविद्यालयाच्या परिसरात मादक पदार्थ, पान, तंबाखु, गुटखा, सिगरेट याचे सेवन करता येणार नाही. महाविद्यालयातील स्वच्छता व विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.

१३. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या शिस्तीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. महाविद्यालयाच्या आवारातील व बाहेरील अक्षम्य गैरवर्तणुकीकरता विद्यार्थ्यांस महाविद्यालयातून काढून टाकले जाईल.

१४. विद्यार्थ्यांच्या व त्यांच्या पालकांच्या स्थानिक पत्त्यात व मोबाईल क्रमांक, ई-मेल मध्ये बदल झाल्यास कार्यालयास ताबडतोब कळविणे आवश्यक आहे.

१५. प्रवेश घेतेवेळी उपलब्ध असलेल्या सोयी सवलतीं व्यतिरिक्त इतर कोणत्याही नवीन गोष्टींची मागणी विद्यार्थ्यास व्यक्तिगत किंवा आंदोलनात्मक पातळीवर करता येणार नाही.

१६. महाविद्यालयात मिळणाऱ्या कोणत्याही शिष्यवृत्ती व सवलतींना आपण पात्र आहोत हे ठरविण्याची जबाबदारी सर्वस्वी विद्यार्थ्यांची व पालकांची आहे. त्याचप्रमाणे त्यासाठी करावयाचे अर्ज व आवश्यक कागदपत्रे वेळेवर देण्याची जबाबदारी विद्यार्थी व पालकांची आहे.

१७. महाविद्यालयातील परिसरात असलेल्या फुलझाडाची फुले तोडू नये. तोडल्यास कार्यवाही करण्यात येईल.

१८. विद्यार्थ्याला महाविद्यालय सोडल्याचे मुळ प्रमाणपत्र दिल्यानंतर सहा महिन्याचे आत कोणत्याही सबबीखाली महाविद्यालय सोडण्याचे डुप्लीकेट प्रमाणपत्र मिळणार नाही. त्यानंतर १००/- रू स्टॅम्प पेपर हरविल्यो ॲफिडेव्हीट व पोलीस रिपोर्ट FIR प्रत सादर केल्याशिवाय डुप्लीकेट टि.सी. मिळणार नाही.

१९. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या अशैक्षणिक चळवळीत व विध्वंसक कृतीत (Non-Academic and Violent Activities) मध्ये भाग घेऊ नये.

२०. खालील बाबींवरून कोणत्याही विद्यार्थ्यांचे नांव महाविद्यालयातून काढून टाकण्याचे किंवा त्यास योग्य कार्यवाही करण्याचे अधिकार प्राचार्यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

अ) कॉलेजचे देणे (College Dues) देण्यास असमर्थ ठरत असल्यास

ब) शैक्षणिक प्रगती व उपस्थिती कमी पडत असल्यास.

क) विद्यार्थ्यांचे वर्तन असमाधानकारक वाटस असल्यास.

ड) महाविद्यालयाच्या नियमांचे उल्लंघन करीत असल्यास.

ई) महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यासोबत गैरवर्तणुक केल्यास.

फ) इतर विद्यार्थी व विद्यार्थीनी सोबत गैरवर्तणुक केल्यास.

२१. ओळखपत्र - महाविद्यालयात प्रवेश घेताच प्रत्येक विद्यार्थ्यास (Identity Card) मिळेल. प्राप्त झालेले ओळखपत्र विद्यार्थ्याने नेहमी जवळ बाळगावे. ओळख पत्र सोबत नसल्यास केव्हाही महाविद्यालयातून बाहेर काढले जाऊ शकते. ग्रंथालयातील वृत्तपत्रे, पुस्तके, प्रयोग शाळेतील उपकरणे किंवा खेळाचे साहित्य हे ओळखपत्र दाखविल्यावरच मिळू शकते. पासपोर्ट आकाराचा फोटो त्यावर चिकटवून त्यावर प्राचार्य/उपप्राचार्यांच्या सहीसाठी अर्ज करून कार्यालयात दाखल करावा. ओळखपत्र हरविल्यास ५० रूपये कार्यालयात भरून नवीन ओळखपत्र मिळू शकेल. प्रवेश मिळाल्यापासून पंधरा दिवसाचे आत ओळखपत्र तयार करून घेणे आवश्यक आहे. सप्टेंबर नंतर ओळखपत्र तयार केल्यास ५० रू. दंड लागेल आणि डिसेंबर नंतर तयार केल्यास १०० रू. दंड लागेल.

२२. शासकिय कामा व्यतिरिक्त विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती त्यांच्या पूर्व परवानगी शिवाय कोणालाही देण्यात येणार नाही.

२३. अ) नागपूर विद्यापीठ वटहुकूम क्र. २ :- जर एखादा विद्यार्थी गंभीर स्वरूपाच्या गैरवर्तणुकीबाबत दोषी ठरत असेल किंवा तो अशाच प्रकारच्या गैरवर्तणुकीचा पाठपुरावा करीत असेल तर प्राचार्य अशा विद्यार्थ्यांच्या पालकाला याची सूचना देऊन व गैरवर्तणुकीची गंभीरता लक्षात घेऊन त्या विद्यार्थ्याला महाविद्यालयातून काढून टाकू शकतील. तसेच परीक्षार्थी म्हणून पुढे होणाऱ्या विद्यापीठाच्या परीक्षेतून वंचित ठरू शकतील. आणि या बाबत प्राचार्यांचा निर्णय अंतिम समजण्यात येईल.

ब) अनुच्छेद क्र. (Clause No. 2) :- उपरोक्त गैरवर्तणुकीच्या गुन्ह्याबद्दल महाविद्यालयातून काढून टाकण्यात आलेल्या किंवा बाहेर घालवून दिलेल्या किंवा परिक्षेपासून वंचित केलेल्या किंवा परीक्षेस अयोग्य ठरविलेल्या विद्यार्थ्याला अन्य महाविद्यालयात प्रवेश घेताना मागील प्राचार्यांची (ज्यांनी अपात्र घोषित करण्याचा निर्णय दिला) परवानगी घेणे आवश्यक राहील आणि जर विद्यार्थी त्याला महाविद्यालयातून काढून टाकल्याचे तथ्य जाणून बुजून लपवीत असेल तर तो कार्यकारी समितीच्या शिस्तभंग कार्यवाहीत पात्र ठरेल.

२४. **महाविद्यालयीन गणवेश**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना महाविद्यालय गणवेश आवश्यक केला असून निश्चित केलेल्या गणवेशातच विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात उपस्थित राहावे. दि. २५.०४.२०१८ ला झालेल्या महाविद्यालयीन मासीक सभेमध्ये सत्र २०१८–२०१९ करीता विद्यार्थ्यांच्या गणवेशात, गणवेशाच्या रंगामध्ये व डिझाईन मध्ये बदल करण्यात आला आहे. गणवेशाबाबतची सुचना व गणवेश नमुना नोटीस बोर्डवर लावण्यात आला आहे. दर गुरुवारी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन गणवेशातून सुट देण्यात आली आहे.

२५. सर्व विद्यार्थ्यांनी आपली वाहने महाविद्यालयीन प्रवेश गेट जवळील सायकल स्टॅंडवरच लावावी. त्यासाठी रोज कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. इतरत्र कोठेही आपली वाहने लावल्यास कार्यवाही करण्यात येईल.

२६. महाविद्यालयाच्या विद्यापीठ परिक्षा केंद्रावर पेपर काळात भ्रमणध्वनी (मोबाईल) आणण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

२७. महाविद्यालयाच्या आचार संहितांबाबत वेळोवेळी सुचना, सुचना फलकावर लावण्यात येईल व विद्यार्थ्यांना सुचना दररोज वाचून सुचनांचा अंमल करावा.

२८. सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनीनी महाविद्यालय परिसरात किंवा वर्गामध्ये शांतता व स्वच्छता ठेवावी. बोलतांना हळू आवाजात शांतपणे बोलावे, कुणीही जोराने बोलु किंवा ओरडू नये.

२९. **शारिरीक शिक्षण :** जे विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेत किंवा आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यात सहभागी होणार नाहीत त्यांना महाविद्यालयातर्फे घेण्यात येणाऱ्या शारिरीक शिक्षण वर्गामध्ये उपस्थित राहणे अनिवार्य आहे. विद्यापीठ पात्र परिक्षेला ठरण्यासाठी शारिरीक शिक्षण वर्गांमधील ७५% उपस्थिती आवश्यक आहे.

३०. **विद्यापीठ परीक्षा :** राष्ट्रसंत तुकडोजी नागपूर विद्यापीठा तर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षासंबंधीचे नियम व त्यासाठी भराव्या लागणाऱ्या आवेदन पत्रासंबंधीची सर्व माहिती, सुचना फलकावर वेळोवेळी लावण्यात येत असते. त्याकडे विद्यार्थ्यांनी लक्ष द्यावे. बी.ए. सेमिस्टर १,२,३,४,५,६ मध्ये प्रवेश घेताच विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परिक्षा फार्म भरणे आवश्यक राहील याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

३१. राष्ट्रीय सेवा योजना शिबीरामध्ये शिबीरातील विद्यार्थी व्यतिरिक्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिबीर स्थळी जावू नये. गेल्यास शिस्तभंगाची कार्यवाही करून प्रवेश रद्द करण्यात येईल.

३२. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात उपस्थित असल्यास वेळापत्रकाप्रमाणे पिरेड करणे अनिवार्य राहील.

३३. महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थीनींनी मिळून महाविद्यालयाच्या परिसरा व्यतिरिक्त बाहेर व बाहेरगावी कुठेही कार्यक्रम घेवू नये. घेतल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

३४. महाविद्यालयच्या परिसरात विद्यार्थ्यांनी विद्यार्थीनींचा (मुलींचा) सन्मान राखावा. स्त्री सन्मानाला कुठल्याही प्रकारची बाधा पोहचल्यास विद्यार्थ्यांवर (मुलावर) शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. तसेच महाविद्यालयाच्या परिसराबाहेर सुद्धा स्त्रीयांचा सन्मान होईल अशी वर्तणुक ठेवावी.

# विशेष सुचना

१. महाविद्यालयाचे प्रथम सत्र दि. १५ जून पासून सुरू होत असून वर्ग दि. १ जुलै पासून नियमित सुरू होतील.

२. महाविद्यालयीन वर्ग सकाळी ८.०० ते ३.०० या कालावधीत भरतील.

३. विद्यार्थ्यांकरीता महाविद्यालयाच्या कार्यालयाची वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी ७.३० ते सायं. ३.०० असून दूपारी १२.३० ते १.०० विश्रांतीची वेळ आहे. शनिवारला ७.३० ते १.०० पर्यंत राहिल.

४. Bonafied, College Leaving Certificate तसेच इतर कुठल्याही प्रमाणपत्रासाठी संबंधीत लिपीकाकडे अर्ज करावा. टी.सी. करीता अर्ज करतांना अर्जावर नामांकन नंबर, वर्ग, वर्ष लिहावेत व अर्जासोबत शेवटच्या वर्षाची गुणपत्रिकेची झेरॉक्स जोडावी. व अर्ज कमीत कमी तीन दिवस अगोदर करावा.

५. बी. ए. भाग १ (सेमिस्टर-१ व सेमिस्टर-२) च्या विद्यार्थ्यांनी स्वत:ची वर्ग १२ वी ची मुळ गुणपत्रिका सत्र संपताच किंवा विद्यापीठ परिक्षा संपताच कार्यालयातून त्वरीत घेऊन जावी.

५. वार्षिक स्नेहसंमेलनाबाबतचा अंतिम निर्णय महाविद्यालयीन विकास समिती आणि प्राचार्य घेईल.

६. महाविद्यालयात विद्यार्थी मंडळ गठणासाठी निवडणूक घेतली जाणार नाही. परंतु विद्यापीठ निर्देशानुसार गुणवत्तेवर आधारित विद्यार्थी मंडळ स्थापन केले जाईल.

७. विद्यापीठ प्रतिनिधींची निवडणूक विद्यापीठ नियमानुसार होईल. विद्यापीठ प्रतिनिधींच्या निवडणूकीनंतर वर्गप्रतिनिधीचे कोणतेही कार्य राहणार नाही.

८. प्रवेश घेतेवेळी घेतलेल्या विषयात बदल करू दिला जाणार नाही. त्यामुळे प्रवेश रद्द केल्यास भरलेली प्रवेश फी व इतर शुल्क परत मिळणार नाही.

९. विद्यार्थ्यांनी ATKT चे नियमानुसार प्रवेश घेतांना आपल्या जवळील सर्व गुणपत्रिका सादर करणे आवश्यक असते.

१०. प्रथम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी विद्यापीठ नामांकन पत्र (Enrolment Form) १५ ऑगस्ट पर्यंत किंवा नागपूर विद्यापीठाने ठरवून दिलेल्या तारखेपर्यंत भरणे आवश्यक आहे.

११. सर्व विद्यार्थ्यांनी विद्यापीठ कार्डस (M-Cards) १५ सप्टेंबर पर्यंत भरून देणे आवश्यक आहे.

१४. माननीय सरन्यायाधिश सर्वोच्च न्यायालय यांचे आदेश क्रमांक २४२९५/२००४ नुसार महाविद्यालयीन परिसरात रॅगींग करणे कायद्यान्वये गुन्हा आहे. महाविद्यालयीन परिसरात रॅगींग संदर्भात कोणतीही तक्रार आल्यास त्याची चौकशी करून दोर्षीवर निलंबनाची कठोर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१६. ऑनलाईन नामांकन फार्म ऑनलाईन परीक्षा फार्म यावर टाकलेले विषय हे तपासून घ्यावे. व त्याची एक प्रत विद्यार्थ्यांनी स्वत: जवळ ठेवावी.

१७. विद्यापीठ करीता विषयाची ऑडीट लिस्ट नोटीस बोर्डवर लावल्या जाईल. ती सर्व विद्यार्थ्यांनी पाहून आपले विषयाची खात्री करून घ्यावी.

# विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सवलती व शिष्यवृत्त्या

सूचना : कोणत्याही विद्यार्थी किंवा विद्यार्थीनीना एकाच वेळी फक्त एकच शिष्यवृत्तीचा किंवा सवलतीचा फायदा मिळू शकेल. शिष्यवृत्ती व सवलत यांचा निर्देश खाली केला आहे. याबाबत अधिक चौकशी कार्यालयात करावी.

१. भारत सरकारच्या राष्ट्रीय शिष्यवृत्त्या. २. भारत सरकारकडून राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्त्या योजना.

३. प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या मुलांकरीता भारत सरकारच्या गुणवत्तेवर आधारित शिष्यवृत्त्या.

४. बिगर हिंदी भाषिक प्रांतीतील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिक पुढील हिंदीच्या अभ्यासाकरीता शिष्यवृत्त्या.

५. स्वातंत्र्य संग्राम सैनिकांच्या मुलामुलींना मिळणाऱ्या शैक्षणिक सवलती फी माफी शिष्यवृत्त्या आणि पुस्तकासाठी अनुदान.

६. आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या पालकांच्या मुलामुलींसाठी राज्य सरकारची फी माफीची सवलत.

७. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा शिक्षकांच्या मुलामुलींना राज्य सरकारची फी सवलतीची योजना. ८. सैनिकांच्या मुलांना राज्य सरकारच्या फी माफीची सवलत.

९. अशासकीय महाविद्यालयातील बिना मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारच्या गुणवत्तेवर आधारलेल्या सवलती. १०. अपंग शिष्यवृत्त्या

११. WCL मधील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना WCL च्या वतीने शिष्यवृत्ती दिली जाते.

१२. सत्र २०१०-११ पासुन शासकीय आदेशानुसार कोणत्याही प्रकारची शासकीय शिष्यवृत्ती राष्ट्रीयकृत बँकेद्वारे देण्यात येईल यामुळे संबंधीत विद्यार्थ्यांनी वडनेर येथील बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयकृत बँकेत स्वत:चे खाते उघडून प्रवेश घेतेवेळी आवेदन पत्रात व शिष्यवृत्ती अर्ज सादर करतांना स्वत:चे बचत खाते क्रमांक देणे व संबंधीत बँकेचा IFSC MICR कोड नंबर देणे अनिवार्य राहील. त्याशिवाय शिष्यवृत्ती मिळणार नाही. व याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांची राहील. महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

## बी. ए. कला शाखेतील अनुदानीत तुकडीचे मंजुर विद्यार्थी संख्या

| अ.क्र. | विद्या शाखा | तुकड्या | मंजुर विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १) | बी. ए. भाग १ (सेमिस्टर १ व २) | १ | १०० |
| २) | बी. ए. भाग २ (सेमिस्टर ३ व ४) | १ | १०० |
| ३) | बी. ए. भाग ३ (सेमिस्टर ४ व ५) | १ | १०० |

## बी. ए. कला शाखेतील विना अनुदानीत तुकडीचे मंजुर विद्यार्थी संख्या

| अ.क्र. | विद्या शाखा | तुकड्या | मंजुर विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १) | बी. ए. भाग १ (सेमिस्टर १ व २) | ३ | ३२० |
| २) | बी. ए. भाग २ (सेमिस्टर ३ व ४) | २ | २२० |
| ३) | बी. ए. भाग ३ (सेमिस्टर ५ व ६) | १ | १२० |

# शिक्षण शुल्क

**महाविद्यालयात प्रवेश घेतांना विद्यार्थ्यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नियमानुसार खालीलप्रमाणे शुल्क भरणे आवश्यक आहे.**

| Sr. No. | Fee Type | Grant Aids | | | Non Grant Aids | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | B.A. I | B.A. II | B.A. III | B.A. I | B.A. II | B.A. III |
| 1 | Tuition Fee | 800 | 800 | 800 | 5496 | 5496 | 5496 |
| 2 | Game & Sport Fees | 240 | 240 | 240 | 300 | 300 | 300 |
| 3 | ICard Fees | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 4 | Library Fees | 200 | 200 | 200 | 300 | 300 | 300 |
| 5 | Extra Curricular Activities | 80 | 80 | 80 | 150 | 150 | 150 |
| 6 | Medical Exam Fees | 40 | 40 | 40 | 30 | 30 | 30 |
| 7 | Phy. Eff. Test Fees | 40 | 40 | 40 | 30 | 30 | 30 |
| 8 | Student Aid Fund | 60 | 60 | 60 | 100 | 100 | 100 |
| 9 | College Magazines Fees | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 10 | Admission Fees | 15 | 15 | 15 | 100 | 100 | 100 |
| 11 | Enrolment Fees | 110 | - | - | 110 | - | - |
| 12 | Union Fees | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 |
| 13 | Student Welfare Fees | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 |
| 14 | Student Medical Fees | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 |
| 15 | Ashwamegh/Indradhanush | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 16 | Student Council | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 |
| 17 | E-Suvidha | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 18 | Internal/College Exam Fees | 90 | 90 | 90 | 90 | 90 | 90 |
| 19 | Annual Fees | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 |
| 20 | Medical Form | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 |
| 21 | Medical Aid Fund | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 |
| 22 | Games Fees | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 23 | Student Aid Fund Form | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 |
| 24 | Disaster Management Fund | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 25 | University Development Fund | 10 | 10 | 10 | 600 | 600 | 600 |
| 26 | Maintenance Fees | - | - | - | 320 | 320 | 320 |
| 27 | Environment | - | 100 | - | - | 100 | - |
| 28 | Home Economics Practical | 300 | 300 | 300 | - | - | - |
| | **TOTAL** | **2377** | **2367** | **2267** | **8018** | **8008** | **7908** |

सूचना : १. शासन/विद्यापीठ धोरणानुसार शुल्क रचनेत बदल होऊ शकतो. विद्यापीठ नोंदणी शुल्क बी. ए. भाग १ च्या विद्यार्थ्यांकरीताच आहे. ३. प्रवेश निश्चितीपासून ३० दिवसांच्या आत आवश्यक शुल्क महाविद्यालय जमा करावी. ४. जमा केलेल्या प्रत्येक शुल्काकरीता पावती घ्यावी व ती शेवटपर्यंत जपून ठेवावी. ५. विद्यापीठ परिक्षा फी व फार्म नोव्हेंबर महिन्यात भरण्यात येतात. ६. इ.बी.सी. क्रिमीलेयर व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क आणि प्रवेश शुल्काची प्रतिपूर्ती शासनाकडून होते. ७. शिष्यवृत्ती इ.बी.सी. व क्रिमीलेयर अर्ज न भरल्यास महाविद्यालयीन शिक्षण व प्रवेश शुल्क विद्यार्थ्यांना स्वतः भरावी लागेल. ८. सूचना फलकावरील सूचना विद्यार्थ्यांनी नियमित वाचाव्या. स्वतः बद्दलच्या त्रुटी संबंधितांकडून त्वरीत दुरुस्त करून घ्याव्यात. विलंबामुळे प्रवेश रद्द होऊ शकतो.

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय

वडनेर, त. हिंगणघाट, जि. वर्धा. – ४४२३०७

## -: कार्यालयीन संपर्क :-

| | |
|---|---|
| १) चौकशी व कार्यालयीन माहिती व प्रवेशाकरीता | श्री. नरेश एम. कातडे, मुख्य लिपीक |
| २) नागपूर विद्यापीठ परिक्षा फॉर्म परिक्षा प्रवेश पत्र, मार्कशिट | श्री. शंकर एस. कापसे, वरिष्ठ लिपिक |
| ३) शिष्यवृत्ती, ओळखपत्र, बोनाफाईड, लिव्हींग प्रमाणपत्राकरीता, माहिती पुस्तिका | श्री. संजय के. पर्वत, कनिष्ठ लिपीक |
| ४) ग्रंथालय विभाग | प्रा. सारीका चौधरी, प्रभारी ग्रंथपाल<br>कु. प्रिती एस. सायंकार, ग्रंथालय परिचर |
| ५) पर्यावरणशास्त्र (बी.ए. भाग २ करीता आवश्यक) | प्रा. पंकज मून |
| ६) महाविद्यालय प्रवेश समिती | अध्यक्ष प्राचार्य विनोद मुडे,<br>मुख्य लिपीक श्री. नरेश कातडे व<br>महाविद्यालयीन सर्व प्राध्यापक वर्ग |

## महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग

| | |
|---|---|
| १) मराठी विभाग | : प्रा. डॉ. प्रविण कारंजकर (विभाग प्रमुख),<br>प्रा. रूणाली ठाकरे, प्रा. तारकेश्वरी देवतळे, प्रा. प्रियंका गुडधे |
| २) इंग्रजी विभाग | : प्रा. नितेश तेलहांडे (विभाग प्रमुख), प्रा. संजय दिवेकर, प्रा. अभय दांडेकर |
| ३) समाजशास्त्र विभाग | : प्रा.डॉ. गणेश बहादे (विभाग प्रमुख) |
| ४) राज्यशास्त्र विभाग | : प्रा. विनोद मुडे (विभाग प्रमुख), |
| ५) इतिहास विभाग | : प्रा. पंकज मुन (विभाग प्रमुख) |
| ६) अर्थशास्त्र विभाग | : प्रा.डॉ. विठ्ठल घिनमिने (विभाग प्रमुख) |
| ७) गृहअर्थशास्त्र विभाग | : प्रा. आरती देशमुख (विभाग प्रमुख) |
| ८) शारिरीक शिक्षण विभाग | : प्रा. डॉ. नरेश भोयर (विभाग प्रमुख) |
| ९) ग्रंथालय विभाग | : प्रा. सारीका चौधरी (प्रभारी ग्रंथपाल) |

### महाविद्यालयाचे शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग

| | |
|---|---|
| १) श्री. नरेश एम. कातडे – मुख्य लिपीक | ५) श्री. अंकुश डब्ल्यु. वैद्य – शिपाई |
| २) श्री. शंकर एस. कापसे – वरिष्ठ लिपीक | ६) श्री. सुरेश डी. तेलतुमडे – शिपाई |
| ३) श्री. संजय के. पर्वत – कनिष्ठ लिपीक | ७) कु. विजयालक्ष्मी बी. जारोंडे – शिपाई |
| ४) कु. प्रिती एस. सायंकार – ग्रंथालय परिचर | ८) श्री. अरूण पी. तिमांडे – शिपाई |

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर

## महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद



प्रा. अभय दांडेकर, प्रा. संजय दिवेकर, प्रा. नितेश तेलहांडे, प्रा. पंकज मुन, प्रा. आरती देशमुख
प्रा. रूपाली ठाकरे, प्रा.डॉ. शालीनी हटवार, प्रा.डॉ. विठ्ठल घिनमिने, प्रा.डॉ. गणेश बहादे,
प्राचार्य विनोद मुडे, डॉ. प्रविण कारंजकर, प्रा. सारीका चौधरी, प्रा. नरेश भोयर, प्रा. सुरज खोडे
प्रा. महेश झोटींग, प्रा. चंद्रकांत राडे, प्रा. प्रियंका गुडधे, प्रा. तारकेश्वरी देवतळे, प्रा. छाया मोहिजे.

## महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद




संजय पर्वत, शंकर कापसे, प्राचार्य विनोद मुडे, नरेश कातडे, सारीका चौधरी, प्रिती सायंकार,
सुरेश तेलतुंबडे, अंकुश वैद्य, अरूण तिमांडे, विजयालक्ष्मी जारोंडे



इंग्रजी अभ्यास मंडळाच्या उद्घाटन प्रसंगी प्रा. अमोल घुमडे प्रियदर्शनी महा. वर्धा प्रा. नितेश तेलहांडे, प्रा. संजय दिवेकर, व अभ्यास मंडळाचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्य आयोजीत "सावित्री उत्सव" त सहभागी सावित्रीच्या वेशभूषेतील महाविद्यालयीन विद्यार्थीनी



महाविद्यालयीन माजी विद्यार्थी निखिल वाघ यांच्या वाढदिवसा निमित्य स्वच्छतेचा संदेश देत महाविद्यालयाला कचरा कुंडी भेट देतांना.



गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे कृत्रिम पुष्परचना प्रशिक्षण घेतांना महाविद्यालयीन विद्यार्थीनी



युवा स्फूर्ति महोत्सव २०१८-१९ मधील सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी व विद्यार्थीनी




डॉ. पंजाबराव देशमुख कृषी संशोधन केंद्र, कुटकी येथे कृषी सेवा उपक्रमातील विद्यार्थी-विद्यार्थीनी भेट देतांना सोबत समन्वयक डॉ. विठ्ठल घिनमिने



कैलास वा. पिंपळापुरे बी.ए. भाग २ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन २० कि.मी. चाल स्पर्धेत तृतीय पुरस्कार प्राप्त करतांना



महाविद्यालयीन निसर्गरम्य परिसरातील क्रिडांगणावर कबड्डी या खेळाचा सराव करतांना महाविद्यालयीन कबड्डी पटू



नॅक समिती
महाविद्यालयीन
प्रांगणातून
प्रवेश करतांना

नॅक समिती
महाविद्यालयीन
परिसरात वृक्षारोपण
करतांना





महाविद्यालयीन
व्यवस्थापन
समिती व नॅक समिती
महाविद्यालात चर्चा
करतांना

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर



राष्ट्रीय मुल्यांकन व मान्यता परिषद (NAAC) बँगलोरचे अध्यक्ष डॉ. देवाबाकटिना हरिनारायणा प्रो-व्हाईस चॉन्सलर
ऋषीकोंडा विशाखापट्टनम आंध्रप्रदेश, समन्वयक डॉ. अंजना राणी, विभाग प्रमुख लोकप्रशासन एम.डी. युनिर्व्हसीटी
रोहतक, हरियाणा, सदस्य प्राचार्य डॉ. बारोत जयेशकुमार नाथलाल सातलासना, गुजरात
महाविद्यालयाचे संस्थापक सचिव प्रा. दिवाकर गमे, महाविद्यालयीन नॅक समन्वयक प्रा. संजय दिवेकर
यांच्याकडून दि. २७ एप्रिल २०१९ ला महाविद्यालयीन नॅक तपासणी अहवाल स्विकारतांना प्राचार्य विनोद मुडे.



दि. २६ व २७ एप्रिल २०१९ ला महाविद्यालयाला राष्ट्रीय मुल्यांकन व मान्यता परिषद (NAAC) बँगलोर भेटी प्रसंगी उपस्थित
अध्यक्ष डॉ. देवाबाकटिना हरिनारायणा प्रो-व्हाईस चॉन्सलर ऋषीकोंडा विशाखापट्टनम आंध्रप्रदेश,
समन्वयक डॉ. अंजना राणी, विभाग प्रमुख लोकप्रशासन एम.डी. युनिर्व्हसीटी रोहतक, हरियाणा,
सदस्य प्राचार्य डॉ. बारोत जयेशकुमार नाथलाल सातलासना, गुजरात
महाविद्यालयाचे संस्थापक सचिव प्रा. दिवाकर गमे, सहसचिव अविनाश गमे, प्राचार्य विनोद मुडे,
नॅक समन्वयक प्रा. संजय दिवेकर व महाविद्यालयातील उपस्थित प्राध्यापक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग